| MHPA100002782019 | मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज क्र.१९/२०१९<br><br>चंद्रकांत उप्परवाड .....अर्जदार<br>**विरुध्द**<br>शकील पठाण .....गैरअर्जदार |
|---|---|

## <u>निशाणी क्र. ५ वरील आदेश</u>

**०१)** दिनांक २३/०२/२०१९ रोजी झालेल्या मोटार वाहन अपघातामध्ये अर्जदार यांना गंभीर दुखापती झाल्यामुळे व अपंगत्व आल्यामुळे मोटार वाहन कायदा कलम १४० खालील तरतुदीनुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०२)** अर्जदाराने असे कथन केले आहे की, दिनांक २३/०२/२०१९ रोजी अर्जदार व ईतर प्रवासी मिनी बस क्र.एमएच.२४-एबी/८००४ मध्ये बसून त्यांचे गावी जात होते. जेंव्हा त्यांची बस अहमदपूर ते नांदेड रोडवरील सखाराम राठोड यांचे शेताजवळ आली असता त्यावेळेस एक टीप्पर क्र.एमएच.०४-डीएस/०६०८ वरील चालकाने त्याच्या ताब्यातील टीप्पर हे हलगर्जीपणाने व निष्काळीपणाने चालविल्याने त्यांच्या बसला पाठीमागून जोरात धडक दिली. सदर अपघातात अर्जदार गंभीर जखमी झाला. अपघातानंतर अर्जदारास गंभीर स्वरुपाच्या जखमा झाल्याने तो कत्रुवार हॉस्पीटल, नांदेड येथे दिनांक २३/०२/२०१९ ते ०१/०३/२०१९ या कालावधीत अंर्तरुग्ण म्हणून भरती होता.

०३) सदर अपघाताबाबत राजेश सिताराम वाडकर यांनी अहमदपूर पोलीस स्टेशन येथे टीप्पर क्र.एमएच.०४-डीएस/०६०८ चे चालकाविरुध्द तक्रार दिली व सदरची तक्रार गुन्हा नोंद क्र.६३/२०१९, कलम २७९, ३०४(ए), ३३७, ३३८ भा.दं.वि. अन्वये नोंद करण्यात आली.

०४) सदर अपघात हा टीप्पर क्र.एमएच.०४-डीएस/०६०८ च्या चालकाच्या चुकीमुळे झाला. गैरअर्जदार क्र.१ हे सदर टीप्परचे मालक असून सदर वाहनाचा विमा हा गैरअर्जदार क्र.२ यांचेकडे उतरविण्यात आला होता. गैरअर्जदार क्र.३ हे टीप्पर वरील चालक आहेत. तसेच गैरअर्जदार क्र.४ हे मिनीबस या वाहनाचे मालक असून सदर वाहनाचा विमा हा गैरअर्जदार क्र.५ यांचेकडे उतरविण्यात आला होता.

०५) अपघातामध्ये अर्जदार यांना गंभीर स्वरुपाची दुखापत झाल्यामुळे त्यांना कायमस्वरुपी अपंगत्व आले आहे. या कारणावूरुन अर्जदार यांनी प्रस्तुतचा अंतरिम नुकसान भरपाईचा अर्ज गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांच्याविरुध्द दाखल केलेला आहे.

०६) गैरअर्जदार क्र.१ यांना नोटीस तामिल होवून देखील ते हजर न झाल्याने सदरचा अर्ज हा त्यांच्याविरुद एकतर्फा आदेश करुन चालविला.

०७) गैरअर्जदार क्र.२ यांनी मुळ अर्ज आणि अंतरिम नुकसान भरपाईच्या अर्जास जबाब दाखल केलेला असून तो नि.क्र.२३ वर आहे. त्यांनी त्यांच्या जबाबात अपघात झाल्याबाबत व सदर अपघातात अर्जदारास गंभीर

स्वरुपाच्या जखमा झाल्याचे नाकारले आहे. त्यांनी नाकारले आहे की, टीप्पर क्र.एमएच.०४/डीएस-०६०८ हा हलगर्जीपणाने व निष्काळजीपणाने चालविल्याने सदरचा अपघात झाला आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदरचा अपघात हा मिनी बस क्र.एमएच.२४-एबी/८००४ च्या चालकामुळे झाला असल्याने गैरअर्जदार क्र.३ ते ५ हे नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत.

०८) गैरअर्जदार क्र.३ व ४ यांना नोटीस तामिल होवून हजर झाले परंतु त्यांनी त्यांच्या बचावार्थ कैफीयत दाखल केली नाही. त्यामुळे अर्ज त्यांच्या विरूध्द विनाकैफीयत चालवण्याचा आदेश पारीत केला.

०९) गैरअर्जदार क्र.५ विमा कंपनीने मुळ अर्ज आणि अंतरिम नुकसान भरपाईच्या अर्जास जबाब दाखल केलेला असून तो नि.क्र.२५ वर आहे. गैरअर्जदार क्र.५ यांनी अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की, मिनी बस क्र. एमएच.२४/एबी-८००४ या वाहनाचा सदर अपघाताशी कोणताही संबंध नाही. तसेच अर्जदारास दुस-या वाहनाने धडक दिली आहे आणि सदर अपघातास अर्जदार हा त्याच्या स्वतःच्या चुकीमुळे जबाबदार आहे. तसेच सदरहू अपघातामध्ये अर्जदार यांना कायमस्वरुपी अपंगत्व आले आहे हेही अर्जातील विधान स्पष्टपणे नाकारले आहे. अर्जात नमुद केल्याप्रमाणे अर्जदार यांनी मागणी केलेली अंतरिम नुकसान भरपाई तसेच मुळ अर्जात नमुद केलेली नुकसान भरपाईची मागणी स्पष्टपणे नाकारली आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.५ हे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी मागणी करतात.

**१०)** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजुंच्या कथनावरुन तसेच अभिलेखावर दाखल करण्यात आलेले पोलीस पेपर्सवरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, वरील वाहनांच्या झालेल्या अपघातात अर्जदार **चंद्रकांत पि.संभाजी उप्परवाड,** वय – ०५ वर्षे हा जखमी झालेला आहे. त्याला गंभीर स्वरुपाची जखम झाल्यामुळे कायमस्वरुपी अपंगत्व आल्याचे अभिलेखावर दाखल करण्यात आलेल्या अपंगत्वाच्या दाखल्यावरुन प्रथमदर्शनी दिसून येते.

**११)** अर्जदार यांनी अभिलेखावर अपघाताच्या अनुषंगाने असलेले पोलीस कागदपत्रांच्या सत्यप्रत, फिर्याद, घटनास्थळ पंचनामा, विमा प्रमाणपत्र, आर.सी.बुक, वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेले कायमस्वरुपी अपंगत्वाबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र असे कागद दाखल केलेले आहेत.

**१२)** मोटार वाहन कायदा कलम १९८८ चे उपकलम १ कलम १४० नुसार कायमस्वरुपी अपंगत्वासाठी अंतरिम नुकसान भरपाईची रक्कम ही रुपये २५,०००/- अशी ठरविलेली आहे. तसेच कलम १४० चे उपकलम ३ नुसार अर्जदार यांना सदरहू अपघात हा कोणाच्या चुकीच्या कृतीमुळे, निष्काळजीपणामुळे, वाहन चालकाच्या कमतरतेमुळे झाला याबद्दल कथन करुन ते शाबीत करण्याची जबाबदारी ही नाही. वरील सर्व बाबींचा तसेच या केसमधील घटनांचा मोटार वाहन कायदा कलम १९८८ चे कलम १४० प्रमाणे विचार करता मी या मतास आलो आहे की, अर्जदार यांना वरील अर्जात नमुद अपघातात आलेल्या कायमस्वरुपी अपंगत्वापोटी अंतरिम नुकसान भरपाई रक्कम रुपऐ

२५,०००/- मिळण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश निर्गमित करतो.

## आदेश

१) अर्ज निशाणी क्र.५ मंजुर करण्यात येतो.

२) गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांनी संयुक्तिकरित्या व वैयक्तिकरित्या अंतरिम नुकसान भरपाई पोटी रक्कम रुपऐ २५,०००/- (अक्षरी रुपऐ पंचेवीस हजार मात्र) ही अर्जदार यांना आजपासून एक महिन्याचे आत दयावी.

३) गैरअर्जदार यांनी वरील अंतरिम नुकसान भरपाईची रक्कम वरील नमुद केलेल्या कालावधीत न भरल्यास आदेशाचे तारखेपासून ते रक्कम पूर्ण वसूल होईपर्यंत त्यावर वार्षिक ६ टक्केप्रमाणे व्याज मिळण्यास अर्जदार पात्र राहतील.

४) गैरअर्जदाराने अंतरिम नुकसान भरपाईची रक्कम प्राधिकरणाने अद्यावत ठेवलेले खातेदार व त्याचे नांव : Ex Officio Member Motor Accident Claim tribunal Gangakhed, Customer Name : Dist & Sessions Judge Gangakhed खाते क्रमांक 40791205612, आय.एफ.एस.सी. कोड एसबीआयएन 0020023, स्टेट बँक ऑफ इंडिया, गंगाखेड या बँकेत आर.टी.जी.एस. अथवा एन.ई.एफ.टी. व्दारे जमा करावी.

५) अर्जदाराने स्वत:चे पॅनकार्ड व आधारकार्ड सोबत लिंक असलेले त्याचे बचत खाते क्रमांक नुकसान भरपाईची रक्कम जमा करणेकामी सादर करावेत.

DINESH DATTATRAYA KURULKAR
Digitally signed by DINESH DATTATRAYA KURULKAR
Date: 2025.06.19 17:01:15 +0530

(डी. डी. कुरुलकर)
सदस्य, मोटार वाहन अपघात प्राधिककरण
गंगाखेड.

दिनांक - १८/०६/२०२५